

# पुण्यात कलाकार स्नेहमेळावा उत्साहात संपन्न


e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in | रविवार दिनांक 02/02/२०२५ | METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे || पान 8 || अंक 38 || RNI - MAHMAR/2021/51259 || metrocity924@gmail.com


# केंद्र सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) तिसऱ्यांदा लोकसभेची निवडणूक जिंकत देशात सत्ता स्थापन केली आहे. मोदी यांच्या तिसऱ्या सरकारचा पहिला अर्थसंकल्प आज (१ फेब्रुवारी २०५) सादर करण्यात आला. यावेळी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी गरीब व मध्यमर्गीयांसाठी अनेक योजना सादर केल्या. वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी भरीव तरतूद जाहीर केली. नव्या सरकारने शिक्षण क्षेत्रालाही महत्त्व दिलं आहे.



**नवीन करप्रणालीनुसार प्राप्तीकरात मोठा बदल**

नवीन करप्रणालीनुसार प्राप्तीकराच्या टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. नव्या करप्रणालीनुसार १२ लाखांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कुठलाही कर लागणार नाही असं जाहीर करण्यात आलं आहे. ही या अर्थसंकल्पातील सर्वात मोठी घोषणा आहे यात शंकाच नाही.

**नव्या करप्रणालीनुसार कर कसा लागणार?**

० ते ४ लाख रुपये उत्पन्न - कर नाही

४ ते ८ लाख रुपये उत्पन्न - ५ टक्के कर

८ ते १२ लाख रुपये उत्पन्न - १० टक्के कर

१६ ते २० लाख रुपये उत्पन्न - २० टक्के कर

२० ते २४ लाख रुपये किंवा त्यावरील उत्पन्न - ३० टक्के कर

**मध्यवर्गीयांसाठी कुठल्या घोषणा?**

TDS मर्यादा १० लाख रुपये करण्यात आली आहे, ज्याचा मध्यवर्गीय नोकरदारांना फायदा होणार आहे.

पुढील आठवड्यात देशात नवीन प्राप्तीकर विधेयक आणलं जाईल.

ज्येष्ठ नागरिकांसाठी कर सवलत दुप्पट, ५० हजारांवरून एक लाख रुपये

वैद्यकीय उपकरणे आणि कर्करोगाची औषधे स्वस्त होतील.

किसान क्रेडिट कार्ड (KCC) मर्यादा तीन लाख रुपयांवरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. पंतप्रधान धन-धान्य कृषी योजनेचा देशातील १०० जिल्ह्यांना फायदा होणार आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, पुढील आठवड्यात नवीन प्राप्तीकर विधेयक आणले जाईल.

आम्ही निर्यात क्षेत्रात योजना सुरू करू. एमएसएमईंना परदेशात टॅरिफ सहाय्य मिळेल. पुढील आठवड्यात नवीन विधेयक आणले जाईल. या प्रत्यक्ष कर सुधारणा नंतर स्पष्ट केल्या जातील. विमा क्षेत्रासाठी एफडीआय मर्यादा वाढवणार आहे अशाही घोषणा त्यांनी केल्या. करदात्यांना दिलासा आणि शेतकरी, तसंच वृद्धांना दिलासा देणारा हा अर्थसंकल्प होता असंच म्हणता येईल.

# कामगार,महिला,सर्वसामान्यांना दिलासा देणारा अर्थसंकल्प - खा.बारणे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) तिसऱ्यांदा लोकसभेची निवडणूक जिंकत देशात सत्ता स्थापन केली आहे. मोदी यांच्या तिसऱ्या सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर करण्यात आला. यावर मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

ते म्हणाले , राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा यंदाचा अर्थसंकल्प कामगार, महिला, सर्वसामान्यांना दिलासा देणारा आहे. १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. हा मध्यमवर्गीय करदात्यांसाठी मोठा दिलासा आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी कर सवलत दुप्पट केली असून ५० हजारांवरून एक लाख रुपये केले आहेत.



एससी, एसटीच्या महिला उद्योजकांसाठी विशेष कर्ज योजना आणली जाणार आहे. पहिल्यांदाच उद्योजक होणाऱ्या महिलांना दोन कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज मिळण्याची तरतूद केली जाणार आहे. ३६ जीवरक्षक औषधे पूर्णपणे करमुक्त केली आहेत. वैद्यकीय उपकरणे आणि कर्करोगाची औषधे स्वस्त होतील. गरीब, युवा, अन्नदाता व नारी या चार घटकांच्या प्रामुख्याने सक्षमीकरणावर भर दिला आहे. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीन लाख रुपयांवरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. पंतप्रधान धन-धान्य कृषी योजनेचा देशातील १०० जिल्ह्यांना फायदा होणार आहे. दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालनासाठी पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाणार आहे. केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला एमयुटीपी तीन प्रकल्पासाठी १४६५ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. पुणे मेट्रोसाठी ८३७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सरकारने अर्थसंकल्पात सोन्यावरील आयात शुल्क दहा टक्के कमी करण्याची घोषणा केली. त्यामुळे परदेशातून सोने आयात करणे दहा टक्के स्वस्त होईल. सरकारने इंटरअ‍ॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्लेवरील शुल्क दहा टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्याच्या दिशेने घेवून जाणारा सर्वंकष असा आजचा केंद्रीय अर्थसंकल्प आहे.

**श्रीरंग बारणे,खासदार,मावळ लोकसभा,उपनेते, शिवसेना**

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
रविवार दिनांक 02/02/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# मध्यमवर्गाच्या हितासाठी महत्त्वपूर्ण निर्णय - आ.शंकर जगताप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड भाजपचे अध्यक्ष व चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ वर प्रतिक्रिया देताना हा अर्थसंकल्प मध्यमवर्ग, शेतकरी आणि रोजगार निर्मितीला चालना देणारा समावेशक आणि दूरदृष्टीचा असल्याचे सांगितले.



**मध्यमवर्गीयांसाठी दिलासा**

आमदार शंकर जगताप यांनी प्राप्तिकर मर्यादेत वाढ, टीडीएस सुधारणा आणि ₹१२ लाखांपर्यंत करमुक्त उत्पन्नाच्या निर्णयाचे स्वागत करत हा मध्यमवर्गीयांसाठी दिलासा असल्याचे नमूद केले.

**शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना**

शेतकरी आणि महिला कल्याण योजनांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधान धनधान्य कृषी योजना 1.7 कोटी शेतकऱ्यांना मदत करणार असून, किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ५ लाख रुपये करण्यात आली आहे.

**लघु उद्योग आणि रोजगार निर्मितीला गती**

लघुउद्योग क्षेत्रात ७.५ कोटी रोजगार निर्मिती होणार असून, MSME ना २० कोटींचे कर्ज आणि स्टार्टअपसाठी क्रेडिट लिमिट २० कोटींवर नेण्यात आली आहे. सूक्ष्म उद्योगांसाठी MSME क्रेडिट गॅरंटी कव्हर ५ कोटींवरून १० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे, तसेच पुढील पाच वर्षांत १.५ लाख कोटी रुपयांचे अतिरिक्त कर्ज प्रदान केले जाणार आहे.

**वैद्यकीय व शिक्षण क्षेत्राला प्राधान्य**

आयटी आणि डिजिटल क्षेत्रातील गुंतवणुकीचे स्वागत करत त्यांनी हे धोरण आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

# महिलांना मोठ्या प्रमाणात विकासाची संधी देणारा अर्थसंकल्प

## आ.अमित गोरखे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी: देशातील शंभर जिल्ह्यांमध्ये धनधान्य योजना सुरू होणार असल्याने शेतकऱ्यांना अधिक विकासाची संधी मिळेल. तूर उडीद आणि मसूर डाळींसाठी सहा वर्ष विशेष अभियान राबवल्यामुळे शेतकरी वर्गाला चांगला आधार प्राप्त होणार आहे. भाजीपाला आणि फळ उत्पादनासाठी राज्यांच्या सहकार्याने योजना येणार असल्याने महाराष्ट्रात एक हरितक्रांती होऊ शकेल. अनुसूचित जाती जमातींसाठी पादत्राणे आणि चामड्यासाठी उद्योजक म्हणून चांगली संधी निर्माण होणार आहे. चर्मोद्योग योजनेमुळे बावीस लाख नवीन रोजगार निर्माण होणार आहेत. मागासवर्गीय महिलांसाठी विशेष योजना आणल्याने हा समाज प्रगतीच्या दिशेने



वाटचाल करेल, असे मत विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी अर्थसंकल्पाबाबत बोलताना मांडले.

ते म्हणाले, "आजवर काँग्रेस अथवा इतर पक्षांच्या सरकारांनी करमर्यादा अतिशय कमी ठेवल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्याची झळ बसत होती. मात्र देशात भारतीय जनता पक्षाची सत्ता आल्यामुळे आज नागरिकांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळत आहे. समाजातील सर्वच घटकांचे मोठ्या प्रमाणात विकास करण्याचे उद्दिष्ट माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी ठेवलेले असल्याने हा अर्थसंकल्प लोकांच्या प्रगतीला दिशा देणार आहे.

शैक्षणिक क्षेत्रात भारतीय भाषांचा विकास आणि आयआयटी संस्था निर्माण होणार असल्याने त्याचबरोबर इंटेलिजन्स वर आधारित संशोधन केंद्रे निर्माण होणार असल्याने वैद्यकीय क्षेत्रात 75000 जागा निर्माण होणार असल्याने रोजगाराची नवीन संधी उपलब्ध होणार आहे. शहरी विकासाला एक लाख कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्याबरोबरच पायाभूत विकासाला राज्यांना याजमुक्त निधी मिळाल्याने या क्षेत्रात आता मोठे बदल होतील.

ज्येष्ठ नागरिकांनाही आता करा मध्ये मोठ्या प्रमाणात सवलत मिळणार आहे." सर्वसामान्य शेतकरी आणि ग्रामीण भागातील महिलांना शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात विकासाची संधी देणारा हा अर्थसंकल्प असल्याने केंद्रीय अर्थमंत्री डॉ. निर्मला सीतारमण यांचे व पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे आमदार अमित गोरखे यांनी विशेष आभार मानले आहेत.

# अर्थसंकल्प अत्यंत निराशाजनक - सचिन चिखले



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

देशाच्या अर्थसंकल्पावर पिंपरी चिंचवड शहर मनसे चे शहर अध्यक्ष सचिन चिखले यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. नुकतेच संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन पार पाडले गेले.अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी सादर केलेला अर्थसंकल्प अत्यंत निराशाजनक असून शेतकरी,कामगार आणि सर्वसामान्य मध्यमवर्गीय जनतेच्या तोंडाला पाणी पुसण्याचे काम अर्थसंकल्पातून झालेले आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाईमुळे सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले गेले आहे परंतू महागाई नियंत्रित करण्यासाठी कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. अशी प्रतिक्रिया सचिन चिखले यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

# देशाला आर्थिक महासत्ता करण्यासाठी अर्थसंकल्प - संदीप बेलसरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

देशाच्या अर्थसंकल्पावर पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

१) १२ लाख उत्पन्न पर्यंत आयकर नाही ही नक्कीच स्वागतर्ह बाब आहे.उद्योजक व मध्यमवर्गीयांना लाभ होणार.

पण बारा लाखाच्या वर आयकर स्लॅब नुसार भरावा लागणार. ४ लाखापुढे आयकर भरावा लागणार . ही स्लॅब पद्धत काढून टाकायला पाहिजे होती.

२) एमएसएमई शेत्रासाठी क्रेडिट गॅरंटी स्कीम ची मर्यादा ५ कोटी होती ती दहा कोटी झाली आहे. याचा एमएसमई ला मोठा फायदा होईल

३) क्रेडिट गॅरंटी स्कीम ची स्टार्ट अप साठी मर्यादा १० कोटी होती ती २० कोटी केल्यामुळे व स्टार्ट अप च्या सुविधा अजून पाच वर्षे चालू राहतील यामुळे स्टार्ट अप ला चालना मिळेल



३) ५ लाख नवउद्योजिका महिलांना २ कोटी पर्यंत मुदत कर्ज मिळणार आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण व औद्योगिक विकासासाठी उपयुक्त

४) निर्यात वाढीसाठी प्रोत्साहन व उत्पादकता वाढविण्यासाठी कालबध्द उपाययोजना करण्यात येणार

अशी प्रतिक्रिया संदीप बेलसरे यांनी दिली आहे.

# मालमत्ता करावरील व्याज माफीसाठी अभय योजना राबवा

## विशाल काळभोर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने सध्या कर वसुलीची जोरदार मोहीम सुरू आहे. महापालिका प्रशासन मालमत्ता कर हा 'जिझिया कर' वसुलीप्रमाणे जबरदस्तीने वसुली करत आहेत. मालमत्ता कर थकल्यामुळे यावर मोठ्या प्रमाणात व्याज लावले आहे. त्यामुळे मालमत्ता करावरील व्याज माफीसाठी अभय योजना राबवा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष विशाल बाळासाहेब काळभोर यांनी केली आहे.याबाबत काळभोर यांनी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक



शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्या निवेदनात म्हटले आहे की, शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मोकळ्या जागा, मिश्र अशा 6 लाख 35 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. तसेच महापालिकेच्या वतीने नोंदणी नसलेल्या नवीन मालमत्ता कर कक्षेत आणण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या नव्याने नोंदणी झालेल्या मालमत्तांमधून महापालिकेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळणार आहे. त्यामुळे थकीत कर वसुलीसाठी महापालिका प्रशासनाने जोर जबरदस्ती करणे योग्य नाही.कोरोना महामारीमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे नागरिकांचा मालमत्ता कर थकला आहे, ही वस्तुस्थिती असली तरी कोरोना महामारीतून आताशी नागरिक सावरत आहेत. मात्र, महापालिका प्रशासन मालमत्ता कर वसुलीसाठी काही प्रमाणात अतिरेक करत आहे. अनेक नागरिकांची मालमत्ता कर भरण्याची तयारी आहे. मात्र, कर आणि व्याजाची रक्कम भरणे त्यांना शक्य होत नाही. त्यामुळे नागरिकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून व्याज माफ करण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात यावी, अशी मागणी काळभोर यांनी केली आहे.

शहरातील काही रहिवाशांचा एक लाखांचा मालमत्ता कर थकला आहे. मात्र, त्यावर दंड हा अडीच ते तीन लाख रुपये लागला आहे. त्यामुळे व्याज माफ करून मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांना पार्ट पेमेंट करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी.



# अखेर अडीच तासांच्या अथक प्रयत्नानंतर बिबट्या जेरबंद!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : शहरातील निगडी, प्राधिकरण येथील संत कबीर उद्यान परिसरात आज (रविवारी) सकाळी बिबट्याने शिरकाव केला होता. लोकवस्तीत बिबट्याने शिरकाव केल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. अडीच तासांच्या अथक प्रयत्नानंतर बिबट्याला जेरबंद करण्यात रेस्क्यू टीमला यश आले आहे.प्राधिकरण येथील संत कबीर उद्यान परिसरात सकाळी दोन बिबटे दिसल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला होता. मात्र



या परिसरात एकच बिबट्या आढळून आला आहे. एका बंगल्यात हा बिबट्या आढळून आला होता. त्यानंतर त्याने शेजारीच असलेल्या संत कबीर उद्यानात धाव घेतली. तेथे एका शेडमध्ये तो लपून राहिला होता. दरम्यान बिबट्याला जेरबंद करण्याकरिता वनविभागासह रेस्क्यू टीम देखील या ठिकाणी दाखल झाली होती. त्यांनी तब्बल अडीच तासाच्या अथक प्रयत्नानंतर या बिबट्याला बेशुद्ध करून जेरबंद केले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

# विद्यार्थ्यांसाठी महापालिकेचा ‘स्कूल कनेक्ट’ उपक्रम!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड महापालिका शाळेतील इयत्ता दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी 'स्कूल कनेक्ट' या उपक्रमाअंतर्गत मोरवाडी आणि कासारवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस आज भेट दिली. यामध्ये राजीव गांधी माध्यमिक विद्यालय नेहरूनगर, माध्यमिक विद्यालय संत तुकारामनगर, माध्यमिक विद्यालय खराळवाडी या शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश होता.शालेय शिक्षण झाल्यानंतर तांत्रिक शिक्षण या ज्ञान शाखेचा परिचय महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने स्कूल कनेक्ट या उपक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांची भेट आयोजित केली होती.

शालेय शिक्षणानंतर करिअरच्या विविध संधी उपलब्ध आहेत, पारंपरिक ज्ञान शाखेसोबतच तांत्रिक शिक्षण ही काळाची गरज आहे. प्रत्येक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

वाढते औद्योगिकीकरण लक्षात घेता भविष्यात तांत्रिक शिक्षण घेतलेल्या कुशल मनुष्यबळाची आवश्यकता अशा आस्थापनांना मोठ्या प्रमाणावर लागणार आहे.

ही गरज ओळखून पिंपरी चिंचवड महापालिका औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी आणि कासारवाडी यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी स्कूल कनेक्ट हा अभिनव उपक्रम राबवला आहे.




# शहरामध्ये निर्जंतुकीकरण करुनच पाणीपुरवठा !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्राकडून पाणी निर्जंतुकीकरण करुन विविध शास्त्रोक्त प्रक्रियांचे अवलंब करुनच शहरामध्ये पाणीपुरवठा केला जातो. महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्राकडून पाणी निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असणारी टी.सी.एल पावडर वापरण्यात येते. नागरिकांना शुध्द पाणी मिळण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्राकडून अत्यावश्यक प्रक्रियांचा अवलंब करण्यात येत असून शहरामध्ये जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर मशीन बंद असल्याचा व



त्यामध्ये बिघाड झाल्याचे ‘एसएमएस’ सध्या नागरिकांपर्यंत पोहोचत असून पाणी निर्जंतुकीकरण न करताच सोडण्यात येणार असल्याचेही त्याद्वारे सांगण्यात येत आहे. असे एसएमएस खोटे व जाणीवपूर्वक पसरविण्यात येत असून अशी कोणतीही परिस्थिती नाही. जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर हाऊस सुरु असून नागरिकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे, असे जलशुध्दीकरण केंद्राकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**नागरिकांनी खोट्या 'एसएमएस' व माहितीवर विश्वास ठेवू नये!**

“सध्या शहरामध्ये फिल्टर मशीन बंद असल्याचे व निर्जंतुकीकरण न करता पाणी सोडण्यात येणार असल्याचे ‘एसएमएस’ पाठविले जात असून यामध्ये कोणत्याही प्रकारे सत्यता नाही. जलशुध्दीकरण केंद्राकडून पाणी निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असणारी टी.सी.एल पावडर वापरण्यात येत आहे. नागरिकांना शुध्द पाणी मिळण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्राकडून अत्यावश्यक प्रक्रियांचा अवलंब करुनच पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी खोट्या माहितीवर विश्वास न ठेवता आपणास येणारे पाणी अशुध्द असल्याचा संभ्रम दूर करावा. सध्या पाठविल्या जाणाऱ्या खोट्या ‘एसएमएस’ पाठविणाऱ्याचा शोध घेवून संबंधितांवर सायबर गुन्हा दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.”

-प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता (१), पाणीपुरवठा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पुण्यात कलाकार स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : आपल्या भारतीय सांस्कृतिक परंपरेतील अत्यंत महत्त्वाचा सण म्हणजे मकर संक्रात याच मकर संक्रातीचे औचित्य साधून पहिल्यांदाच बालगंधर्व परिवार महाराष्ट्र आणि मेघराज राजे भोसले फाउंडेशन (एम.आर.बी.फाउंडेशन ) तसेच अनेक कला संस्थांच्या संयुक्त विद्यमाने .पुणे शहर आणि जिल्ह्यातील महिला आणि पुरुष कलाकारांचा भव्य दिव्य स्नेह मेळावा अतिशय उत्साहात तिळगुळ वाटप करून व हळदीकुंकू वाण वाटप करून अतिशय उत्साहात संपन्न झाला.यावेळी सुप्रसिद्ध निवेदक खेळांचा बादशहा बाळकृष्ण नेहरकर यांनी खास महिला व पुरुष कलाकारांसाठी होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे विशेष सादरीकरण केले .यात सर्वच कलाकारांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी विजेत्या महिला कलाकारांना खास मानाच्या पैठणी साड्या भेट देण्यात आल्या तसेच उपस्थित महिला व पुरुष कलाकारांना लकी ड्रॉ च्या माध्यमातून विशेष बंपर बक्षिसे देण्यात आली. या प्रसंगी विविध क्षेत्रात कर्तुत्व गाजविणाऱ्या मान्यवर महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर. भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई. अलविरा मोशन एंटरटेनमेंटच्या संस्थापक, निर्मात्या दिपाली कांबळे, एम. आर .बी. फाउंडेशनच्या संचालक. हेमलता मेघराज




राजेभोसले. सामाजिक कार्यकर्त्या स्वाती हांडे ,नगरसेविका स्वाती पोकळे , अभिनेत्री. प्राजक्ता गायकवाड . अभिनेत्री सुरेखा कुडची, प्रसिद्ध लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर, लावणी सम्राज्ञी माया खुटेगावकर प्रसिद्ध अभिनेत्री हेमा तुपे- जगताप .चित्रपट निर्मात्या विजयालक्ष्मी जाधव आणि बालगंधर्व परिवाराचे अध्यक्ष तसेच अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले इत्यादी मान्यवर या वेळी उपस्थित होते.याप्रसंगी मेघराज राजे भोसले फाउंडेशन ,बालगंधर्व परिवार महाराष्ट्र ,अखिल भारतीय चित्रपट महामंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ,पिंपरी चिंचवड कलाकार संघ ,कला परिवार हडपसर ,नृत्य परिषद महाराष्ट्र ,यांच्या माध्यमातून खास कलाकारांसाठी "आरोग्य तुमचे संरक्षण आमचे" या धरतीवर आरोग्य विमा मेडिक्लेम पॉलिसीचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.कलाकार मग तो रंगमंचावरचा असो ,पडद्यामागील असो किंवा मालिका चित्रपटात काम करणारा अथवा तमाशातील संगीतबारीतील लोककलावंत असो किंवा साऊंड, लाईट, नेपथ्यकार या प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी म्हणून अत्यंत अल्प दरात कलाकारांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आरोग्य विमा काढून स्वतःच्या आरोग्या विषयी जागरूक आणि सतर्क राहायला हवे असे यावेळी रूपाली चाकणकर म्हणाल्या.कलाकारांनीच कलाकारांसाठी आयोजित केलेल्या या स्नेह मिळाव्यात येऊन खऱ्या अर्थानं आनंद वाटला .कलाकारांच्या अडचणींना वाचा फोडण्यासाठी व त्या सोडविण्यासाठी मी नेहमीच सर्व कलाकारांच्या सोबत कायम असेल असे या वेळी तृप्ती देसाई म्हणाल्या.कलाकारांच्या अडचणी म्हणजे या माझ्या अडचणी आहेत. कलाकारांच्या संरक्षणाची जबाबदारी ही माझी जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत कलाकारांना मी वाऱ्यावर सोडणार नाही. त्यासाठी वाटेल ती किंमत मोजायला मी तयार आहे. म्हणूनच मी मोठ्या प्रयत्नाने संपूर्ण महाराष्ट्रातील नव्हे तर देशभरातील कलाकारांसाठी हा आरोग्य विमा आणलेला आहे कलाकारांनी आजारपणात कुणापुढे हात पसरू नये व त्यांनी स्वाभिमानाने जगावे ही माझी प्रामाणिक भावना असल्याचे यावेळी मेघराज राजेभोसले म्हणाले.

कलाकारांच्या अडचणी सोडविण्यासाठी विशेषतः महिला कलाकारांच्या अडचणी सोडवण्यासाठी आदरणीय मेघराज भैय्यांनी फक्त आवाज दिला तरी मी कायम कलाकारांच्या पाठीशी उभी आहे असे दिपाली कांबळे म्हणाल्या. बालगंधर्व परिवार महाराष्ट्र आणि मेघराज राजेभोसले फाउंडेशन तसेच सर्व कला संस्थांच्या माध्यमातून या स्नेह मिळाव्याचे विशेष आयोजन करण्यात आले ,पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील शेकडो महिला कलाकारांनी यात सहभाग घेतला .प्रास्ताविक मेघराज राजेभोसले यांनी केले. आभार अनिल अण्णा गुंजाळ यांनी मानले. तर पराग चौधरी, .चित्रसेन भवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व महिला व पूरूष कलाकारांनी पुढाकार घेऊन विशेष परिश्रम घेतले.

# सेवानिवृत्त पोलीस अधिका-याची सव्वाकोटीची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : रूग्णालयात अस्थमा आजारावर उपचार घेत असलेल्या सेवानिवृत्त पोलीस अधिका-याची गुंतवणुकीच्या बहाण्याने डॉक्टरनेच सव्वाकोटीची फसवणूक केल्याचा प्रकार थेरगावात उघडकीस आला आहे. याप्रकरणी सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार डॉक्टर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी डॉक्टरचे थेरगावात रूग्णालय आहे. फिर्यादी यांना दम्याचा त्रास असल्याने डॉक्टरच्या रूग्णालयात उपचारासाठी गेले होते.डॉक्टरने फिर्यादी यांना रूग्णालयामध्ये चांगला मोबदला व ५० टक्के भागीदारी देण्याचे आमिष दाखवले. त्यातून फिर्यादी आणि त्यांच्या पत्नीकडून एक कोटी ३७ लाख ५० हजार रुपये घेतले. त्यांनंतर डॉक्टरने रूग्णालय बंद केले. रूग्णालयातील वैद्यकीय साहित्याची परस्पर विल्हेवाट लावली. फिर्यादी यांचे पैसे न देता त्यांची आर्थिक फसवणूक केली. सहायक पोलीस निरीक्षक पवार तपास करीत आहेत.



# घरफोडीतील आरोपी टी-शर्टच्या आधारे ओळखून पकडला

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : घरफोडी करणा-या एका आरोपीला टी-शर्टच्या आधारे ओळखून म्हाळुंगे पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून १८ लाख रूपये किंमतीचे २६ तोळे सोन्याचे दागिने जप्त केले.टुल्लू कुमार रामू राऊत (वय २५, रा. पवार वस्ती चिखली, मुळ, बिहार) आणि त्याच्याकडून दागिने खरेदी करणा-या बालेश्वर प्रसाद नंदलाल साह (वय ४५, रा. मोतीहरी बिहार) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत अरविंद प्रकाश कसाळे यांनी म्हाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० सप्टेंबर २०२४ रोजी कसाळे यांच्या घरी चोरी झाली होती. घराचा कडी-कोयंडा तोडून कपाटातील २६ तोळे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लांबविले होते. पोलिसांनी परिसरातील 'सीसीटीव्ही फुटेज' ताब्यात घेतले होते.

त्यात टुल्लूकुमार हा कसाळे यांच्या घराच्या परिसरात संशयितरित्या वावरताना दिसला. त्याची टी-शर्ट घालण्याची आणि चालण्याची एक पद्धत होती. त्यावरून पोलिसांनी टुल्लूकुमारला ताब्यात घेतले. त्याने चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली. चोरलेले दागिने मुळगावी बिहारला आरोपी बालेश्वरला विक्री केल्याचे सांगितले.

त्यानुसार बिहार येथील नेपाळ सिमेवरील दुर्गम ठिकाणी जावून पोलिसांनी बालेश्वरलाही अटक केली.

# वडिलांचा खून करणाऱ्या मुलाला जन्मठेप


दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : वडिलांवर कोयत्याने वार करुन त्यांचा खून करणाऱ्या मुलाला जिल्हा सत्र न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. सचिन अंबादास खोत (वय २७, रा. ऊरळी कांचन, पुणे-सोलापूर रस्ता) असे जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्याचे नाव आहे.

आरोपी सचिनने वडील अंबादास दिगंबर खोत (वय ५२) यांच्यावर कोयत्याने वार करुन खून केला होता. २९ सप्टेंबर रोजी २०१४ रोजी ही घटना घडली होती. नातेसंबंधातील एका महिलेकडे अंबादास वाईट नजरेने पाहत होते. या कारणावरुन त्यांच्यात वाद झाले होते. २९ सप्टेंबर रोजी त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर सचिनने वडिलांवर कोयत्याने वार करुन खून केला. याप्रकरणी सचिनविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक रणजितसिंग शेंगर यांनी तपास केला होता. त्यांनी आरोपीविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. सरकार पक्षाकडून अतिरिक्त सरकारी वकील नामदेव तरळगट्टी यांनी बाजू मांडली.

परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी ललिता कानवडे यांनी न्यायालयीन कामकाजात सहाय केले. साक्ष, तसेच पुरावे ग्राह्य धरुन आरोपी खोत याला जन्मठेप, तसेच २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावासाची तरतूद न्यायालयाने निकालपत्रात केली आहे.


चित्र : गौतम दिवार

# औंधमधील मसाज पार्लरवर छापा, वेश्याव्यवसाय प्रकरणी गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : औंध भागातील एका मसाज पार्लरमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेने छापा टाकला. या कारवाईत थायलंडमधील चार तरुणींसह नऊ जणींना ताब्यात घेण्यात अले. मसाज पार्लर मालकासह चौघांविरुद्ध चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

औंध भागातील मुरकुटे प्लाझा इमारतीतील मसाज पार्लरमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट चारचे पोलीस निरीक्षक अजय वाघमारे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून खात्री केली. पोलिसांच्या पथकाने मसाज पार्लरवर छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी थायलंडमधील चार तरुणी, तसेच महाराष्ट्र, गुजरातमधील पाच तरुणींना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत तरुणींना पैशांचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त केले जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक




कायद्यान्वये मसाज पार्लरचा मालक, व्यवस्थापकासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक, पोलीस निरीक्षक विजयानंद पाटील, पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, सहायक निरीक्षक नरेंद्र पाटील, उपनिरीक्षक वैभव मगदूम आणि पथकाने ही कारवाई केली. शहर, तसेच उपनगरातील मसाज पार्लरमध्ये गैरप्रकार सुरू असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील अवैध धंदे बंद करण्याचा इशारा दिला आहे. मसाज पार्लरमध्ये सुरू असलेल्या गैरप्रकारांवर त्यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले.

# पिंपरी-चिंचवड शहर पत्रकार संघाच्या 'टॉप टेन' पुरस्काराचे वितरण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : आयटीला चांगले दिवस आले आहेत. भविष्यात आणखी चांगले दिवस येणार आहेत. आयटीचा पुरस्कार केला पाहिजे. नवीन पिढीला ऑटो मोबाईल उद्योगाच्या पुढे जाण्याची आवश्यकता आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेत हिंजवडीचा समावेश करावा. पिंपरी-चिंचवड-हिंजवडी महापालिका असे नामकरण करावे. त्यामुळे शहराची ओळख ऑटो मोबाईल उद्योगाबरोबरच आयटी हबही होईल, असे मत कायनेटीक ग्रुपचे अध्यक्ष, ज्येष्ठ उद्योजक अरुण फिरोदिया यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी पत्रकार संस्था संलग्न पिंपरी-चिंचवड शहर पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या दहा जणांचा 'पीसीएमसी टॉप टेन' पुरस्काराने फिरोदिया यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर होते. महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, कोहिनूर ग्रुपचे प्रमुख, उद्योजक कृष्णकुमार गोयल, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब गोरे, अध्यक्षा सायली कुलकर्णी उपस्थित होते.

फिरोदिया म्हणाले, "पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या वाढली आहे. हुशार लोक आहेत. जवळच आयटी पार्क हिंजवडी, वाकड आहे. आता केवळ पिंपरी-चिंचवड नव्हे तर शहराबरोबर हिंजवडीचाही उल्लेख करावा. महापालिकेत हिंजवडीचा समावेश करावा. पिंपरी-चिंचवड, हिंजवडी महापालिका असे नामकरण करावे. त्यामुळे शहर केवळ ऑटो मोबाईल उद्योग नाही तर आयटी हबही आहे, असे नागरिकांना वाटेल. आयटीला चांगले दिवस आले आहेत. भविष्यात आणखी चांगले दिवस येणार आहेत. आयटीचा पुरस्कार केला पाहिजे. नवीन पिढीला ऑटो मोबाईल उद्योगाच्या पुढे जाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडचा विकास जोरदार होईल. पिंपरी-चिंचवड म्हणजे काय असे कोणी विचारले तर गणपती बाप्पा मोरया असे ऐकले का असे आपण सांगतो. मोरया गोसावीचे गाव म्हणजे पिंपरी- चिंचवड अशी ओळख सांगितली जात होती. त्यानंतर टाटा मोटर्स, एमआयडीसी आल्याने उद्योगनगरी अशी ओळख झाली. आता आयटी एक्सपोर्ट करणारी नगरी अशी ओळख व्हावी. त्यासाठी सर्वांनी प्रोत्साहन द्यावे. पुढची पिढी तयार करणे गरजेचे आहे. आजच्या स्थितीत सर्वात मोठा प्रश्न रोजगाराचा आहे. रोजगार उपलब्ध होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत".

" १९७० पासून माझा पिंपरी-चिंचवडशी संबंध आहे. भारतातील सर्वात मोठी एमआयडीसी पिंपरी-चिंचवडमधील आहे. शहरात टाटा मोटर्ससह मोठे उद्योग, कंपन्या आल्याने आशिया खंडातील सर्वात श्रीमंत नगरपालिका होण्याचा गौरव पिंपरी-चिंचवडला मिळाला. जकातीच्या माध्यमातून मोठे उत्पन्न मिळत होते. पैसे कोठे खर्च करायचे असा प्रश्न होता. कंपनीत काम करणाऱ्या कामगारांसाठी प्राधिकरणात जागा घेतली. आता कामगार तिथे राहतात. अगोदर कामगार पुण्यात वास्तव करत होते. पिंपरी-चिंचवड नावाचा मोठा परिणाम पुण्यावर झाला आहे. कारण, सवाई गंधर्व महोत्सव, फिल्म फेस्टिव्हल, फर्ग्युसन महाविद्यालय पुण्यात आहे", असेही ते म्हणाले.

कृष्णकुमार गोयल म्हणाले, "पिंपरी-चिंचवडने मला घडविले. शहराशी माझे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. शहरातील पत्रकारांनी हेवेदावे बाजूला ठेवून एकत्र यावे. पुण्याप्रमाणे शहरात पत्रकार संघाची स्वतंत्र इमारत उभी करावी. त्यासाठी आवश्यक ती मदत केली जाईल".

यावेळी ज्येष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर यांनी ही आपले मनोगत व्यक्त करताना सध्याची पत्रकारिता, राजकीय परस्थिती याबाबत माहिती दिली.

**पुरस्कारार्थी**

**कृष्णकुमार गोयल (सहकार व उद्योग क्षेत्र),**

**गणेश यादव (पत्रकारिता),**

**ऋतुराज गायकवाड (भारतीय क्रिकेटपटू),**

**इरफान सय्यद (कामगार क्षेत्र),**

**संदीप साकोरे (कला व नाट्य क्षेत्र),**

**विजय जगताप (लेखक व सामाजिक क्षेत्र),**

**महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे (उत्तम प्रशासन),**

**डॉ. बी. सी. डोळस (वैद्यकीय),**

पीसीईटी रेडिओ एफएम (प्रसार व मनोरंजन क्षेत्र) आणि अंजू सोनवणे (प्रेरणादायी रक्तदाते) यांचा 'पीसीएमसी टॉप टेन' पुरस्काराने गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बापूसाहेब गोरे यांनी केले. अक्षय मोरे यांनी सूत्रसंचालन केले. तर, सायली कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संघाचे पदाधिकारी सुनील कांबळे,रेहान सय्यद,गणेश शिंदे,विनय लोंढे,संतोष जराड,प्रसाद बोरसे,जितेंद्र गवळी,सूरज साळवे,शिवाजी घोडे,युनुस खतीब,मुकेश जाधव, शबनम सय्यद आदींनी परिश्रम घेतले.

# जुबेर बाबू शेख यांच्या वतीने कामगारांना मोफत साहित्य वाटप



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुण्यातील भवानी पेठ, काशीवाडी लोहिया नगर परिसरात राहणाऱ्या बांधकाम कामगारांना तसेच बिगारी आणि मिस्तरी यांना मोफत गम बूट वाटप करण्यात आले. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अल्पसंख्यांक सेलचे शहराध्यक्ष जुबेर बाबू शेख यांच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. ५०० कामगारांना मोफत साहित्य वाटप करणार असल्याचे यावेळी जुबेर बाबू शेख यांनी सांगितले. आपल्या शहराचा किंवा आपल्या देशाचा विकास करण्यात कामगारांचा मोलाचा वाटा आहे. शासनाच्या वतीने ही कामगार कल्याण असणारे अनेक योजना राबविल्या जातात. परंतु, शासकीय योजना प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचत नाही, त्यामुळे आपण या कामगारांपर्यंत थोडी का होईना मदत पोहोचविण्याचा संकल्प आपण करत असल्याचे जुबेर बाबू शेख यांनी सांगितले.

यावेळी अनेक कामगार तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्यांक सेलचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


SHABNAM NEWS
आपल्या शहराची बातमी मिळवा
आता शबनम न्यूज च्या ॲप वर
शबनम न्युज
GET IT ON Google Play
प्लेस्टोअर ॲप
आजच
इंस्टॉल करा
Shabnam News
Vyom Technologies
Uninstall
Open
Your Review
Developer contact
About this app
News & Magazines
गुगल प्लेस्टोअर द्वारे
ॲप इन्स्टॉल करा.